# उल्हासनगर महानगरपालिका, शिक्षण विभाग, उल्हासनगर

**वुडलँड कॉम्पलेक्स, सी विंग, ३ मजला, उल्हासनगर**

जा.क्र.उमपा/शिवउ(शिक्षण)/१५४८/२०२३
दिनांक :- २९ मार्च, २०२३.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील शाळेची जागा रात्र महाविद्यालय / रात्र शाळेकरीता देण्याकरीता संस्था निवडीचे अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे :-

१) सन १९५० संस्था नोंदणी कायद्याप्रमाणे संस्था नोंदलेली असावी.

२) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ व मुंबई विद्यापीठ यांचे रात्र महाविद्यालय सुरु करणेबाबतची परवानगी आवश्यक आहे.

३) रात्र शाळा चालविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असावा.

४) लेखापरिक्षण केल्याचा ३ वर्षाचा ताळेबंद सादर करावा.

५) संस्था आर्थिक दृष्टया सक्षम असावी. त्यांचा बँक बॅलेन्स किमान १० लाख असावा. त्याबाबतचे राष्ट्रीयकृत बॅकेचे प्रमाणपत्र सादर करावे.

६) संस्थेला महानगरपालिकेकडे रु. १०,००,०००/- ची सुरक्षा अनामत ठेवावी लागेल. मात्र त्याबाबत कोणतेही व्याज मिळणार नाही.

७) संबंधित संस्थेने किमान १० टक्के विद्यार्थ्यांचे आरक्षण महानगरपालिका विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवणे व या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देणे बंधनकारक राहील. या व्यतिरिक्त शाळेस विविध स्वरुपाच्या सुविधा (उदा. ग्रंथालय, इंटरनेट, इ. सुविधा) संस्थेने त्यांच्या मर्जीनुसार प्रस्तावित कराव्यात. अशा सुविधा पुरविल्यास सदर जागा वापराबाबत संस्थेकडून कोणत्याही स्वरुपाचे भाडे घेण्यात येणार नाही.

८) संस्था पदाधिकाऱ्याच्या विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल नसावा.

९) संस्थेच्या व्यवस्थापन मंडळात वाद नसावा. वाद असल्यास अशी संस्था अपात्र समजली जाईल.

१०) संस्थेने या पुर्वी शासन अथवा महानगरपालिका /नगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने अशा प्रकारचे प्रकल्प राबविले असल्यास अशा संस्थेस प्राधान्य दिले जाईल.

११) संस्थेबरोबर ९ वर्षाच्या कालावधी करारनामा करण्यात येईल. संस्थेला किमान पाच वर्ष व्यवस्थापन व देखभाल पाहण्याकरिता देण्यात येईल. संस्थेने महानगरपालिका अटी व नियमांचे पालन न केल्यास त्यांचे करार रद्द करण्याचा अधिकार आयुक्तांना राहिल. परंतु पाच वर्षानंतर मा. आयुक्त यांचे सदरची संस्था योग्य काम करत नाही, असे मत झाल्यास मा. आयुक्त हा करार संपुष्टात आणू शकतील. मुदतीनंतर आलेले तसेच अपूर्ण प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत. कोणतीही प्रस्ताव स्विकारण्याचा अथवा नाकारणेचा संपूर्ण अधिकार मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांचा राहील.

१२) एकूण विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या १० टक्के जागा निविदाधारक शिक्षण संस्था व किमान १० टक्के जागा उल्हासनगर महानगरपालिका यांचेकडून भरला जातील.

१३) शैक्षणिक शुल्क रचना ठरविणे व त्यामध्ये वाढ करण्याचे अधिकार उल्हासनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभेला असतील.

१४) शैक्षणिक शुल्काचे दर साधारणपणे ३ वर्षे सारखे राहतील.

१५) दर ३ वर्षानंतर महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या पूर्व मान्यतेने शैक्षणिक शुल्काचे दर वाढविण्यात येतील.

१६) रात्र शाळा सुरु करणेसाठी दिलेल्या इमारतीचे वीज, पाणी, रंगकाम इत्यादी बाबतचा खर्च संबंधित संस्थेकडून करण्यात यावा.

**(जमीर लेंगरेकर)**
**अतिरिक्त आयुक्त (शिक्षण)**
**उल्हासनगर महानगरपालिका**